# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.07.2025** **वारःसोमवार**

•संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून प्रारंभ

•कामकाज सुरळीत चालावं यासाठी सहकार्य करण्याचं सरकारचं सर्वपक्षीय बैठकीत आवाहन

•उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भक्तशिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार जाहीर

•पुणे ग्रँड चॅलेंज टूर स्पर्धेमुळे पुणे जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक पटलावर येईल – उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विश्वास

आणि

•शेतकरी नोंदणीमध्ये महाराष्ट्र अग्रेसर; ६४ टक्के शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण

**<u>संसदअधिवेशन</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात होणार आहे. या अधिवेशनाचा कालावधी येत्या २१ ऑगस्टपर्यंत निश्चित करण्यात आला आहे. या अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या २१ बैठका होतील. जनविश्वास सुधारणा विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ या अधिवेशनात सभागृहात चर्चेला येण्याची शक्यता आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं काल नवी दिल्लीत संसद भवनात सर्वपक्षीय बैठक बोलावली होती.

या बैठकीला केंद्रीय मंत्री आणि राज्यसभेतले नेते जे पी नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ एल मुरूगन उपस्थित होते. त्याचबरोबर काँग्रेसचे गौरव गोगोई, प्रमोद तिवारी, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, द्रमुकचे तिरुची सिवा आणि टी आर बालु, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांशी समन्वय साधून काम करावं, असं आवाहन केंद्र सरकारनं या बैठकीत केलं. याबाबत वार्ताहरांशी बोलताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले -------

**<u>बाईट – किरेन रीजीजू</u>**

अधिवेशनात पंतप्रधानांनी संसदेत महत्त्वाच्या विषयांवर निवेदन द्यावं, अशी मागणी कॉंग्रेस पक्षानं  या बैठकीत केल्याची माहिती गौरव गोगोई यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाच विमानं पाडली गेल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यावर आणि पहलगाममध्ये सुरक्षेतील त्रुटीवर बोलावं, अशी मागणी कॉंग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी सरकारला केली आहे.

**<u>पंढरपूर कॉरिडॉर</u>**

पंढरपूर कॉरिडॉरसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत सोलापूर जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. वर्षा निवासस्थानी झालेल्या या बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख उपस्थित होते. यावेळी प्रस्तावित कॉरिडॉरसाठी भूसंपादनासंदर्भात माहिती देण्यात आली. सोलापूर जिल्हा प्रशासनानं पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात स्थानिक नागरिकांच्या शंका दूर करण्यासाठी तीन उपजिल्हाधिकारी पदाच्या व्यक्तीची नियुक्ती केली आहे. येत्या २५ जुलै ते पाच ऑगस्टपर्यंत ही समिती नागरिकांशी दररोज संवाद साधणार आहे.

**<u>एकनाथशिंदे</u>**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांना भक्तशिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार” जाहीर झाला आहे. श्री नामदेव महाराज यांचा ६७५वा संजीवन समाधी सोहळा उद्या आहे. त्यानिमित्त, पंढरपूरच्या संत श्री नामदेव महाराज फड संस्थान आणि संत वंशज यांच्यातर्फे हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. येत्या २४ जुलै रोजी पंढरपूर इथं हा सोहळा होणार आहे.

**<u>इंट्रो : आळंदीएकादशी-बाईटभावार्थदेखणे-सुहास</u>**

आषाढ महिन्यातील वद्य एकादशी आज आहे. त्या निमित्त आळंदीला यात्रा भरते, आषाढ वारीसाठी पंढरपूरला गेलेले वारकरी, आपली वारी  पूर्ण करण्यासाठी ही आळंदीची यात्रा करतात. संत तुकाराम महाराजांची पालखी आपल्या परतीच्या प्रवासात काल आळंदीत आली. संत ज्ञानेश्वर माउलींच्या साडेसातशेव्या जयंती आणि तुकोबांच्या तीनशे 75

व्या वैकुंठ गमन वर्षानिमित्तानं अनेक वर्षांनी उभय संत भेटीचा योग यंदा विश्वस्तांच्या प्रयत्नातून आला आहे. वारकरी परंपरेत ह्या ऐतिहासिक घटनेचा योग खूप वर्षांनी आला असून तुकोबांचा कालचा मुक्काम आळंदीच्या देऊळ वाड्यात कारंजे मंडपात होता. ऐकुया या विषयी अधिक माहिती आळंदी देवस्थानचे विश्वस्त डॉक्टर भावार्थ देखणे यांच्याकडून........

**बाईट – भावार्थ देखणे**

**अजितपवार**

पुढच्या वर्षी जानेवारीमध्ये 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६'च्या रूपाने देशात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकल स्पर्धेचं आयोजन होत आहे; त्या अनुषंगानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त या बैठकीला हजर होते. या स्पर्धेचं यशस्वी आयोजन करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयानं काम करावं असे निर्देश अजित पवार यांनी यावेळी दिले. या स्पर्धेमुळे पुणे शहर आणि जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीनं जागतिक पटलावर येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या स्पर्धेत 40 ते 50 देशातील सायकलपटू सहभागी होणार असून ही स्पर्धा चार टप्प्यात पार पडणार आहे, असं पवार यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत सांगितलं. हिंजवडीमधील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी उपाययोजना करणं, तसंच पुण्यातील धोकादायक पूल पाडण्यासंदर्भात या बैठकीत चर्चा झाल्याचंही अजित पवार यांनी सांगितलं.

**शेतकरीनोंदणीतअग्रस्थानी**

कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना जलद गतीनं आणि परिणामकारकरीत्या देण्यासाठी देशभरात ॲग्रिस्टॅक योजना राबवण्यात येत आहे. यात आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राने सर्वाधिक शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करत अग्रस्थान पटकावलं आहे, अशी माहिती कृषी संचालक रफिक नाईकवाडी यांनी काल दिली. राज्यात एक कोटी 71 लाख 10 हजार 697 शेतकऱ्यांची बँक खाती आहेत. त्यापैकी प्रत्यक्षात एक कोटी आठ लाख 91 हजार शेतकऱ्यांची म्हणजे सुमारे 64 टक्के शेतकऱ्यांची नोंदणी 16 जुलैअखेर पूर्ण झाली आहे. महसूल आणि कृषी विभागानं त्यापैकी 97 लाख 39 हजार 299 शेतकऱ्यांची नोंदणी मंजूर केली आहे.

**शेलार**

गणेशोत्सवाला राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आलं असून त्याची रुपरेषा देखील जाहीर केली आहे; यावर्षीपासून गणेशोत्सव अधिक उत्साहात साजरा करु, असं आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल रायगडमध्ये पेण इथं केलं. हमरापूर, तांबडशेत इथं गणेश मूर्तीकारांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्या कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हयातील विविध लोकप्रतिनिधींसह गणेशमूर्तिकार यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**<u>मलेरिया</u>**

मलेरियाचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीनं लस विकसित करण्यात भारताला यश आलं आहे. भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषद आयसीएमआर आणि National Institute of Immunology म्हणजेच राष्ट्रीय प्रतिकारशक्ती शास्त्र संस्थेचे शास्त्रज्ञ संयुक्तपणे ही मलेरिया प्रतिबंधक लस विकसित करत आहेत. या लशीचे नाव ॲडफॅल्सीवॅक्स असं असून तिच्या प्राथमिक चाचणीचे निकाल आशादायक आहेत. लवकरच ती सार्वत्रिक वापरासाठी उपलब्ध होऊ शकेल. ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत संपूर्ण स्वदेशी संशोधनातून विकसित झालेल्या या लशीमुळे मलेरिया निर्मूलनाला हातभार लागणार आहे.

**<u>एचआयव्ही</u>**

सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या संकल्पनेतून काल एच.आय.व्ही. बाधित युवक युवतींसाठी वधू - वर परिचय मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होत. या मेळाव्यासाठी राज्यासह कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेशातूनही इच्छुक आले होते. जवळपास 245 वधू-वरांची नोंदणी यावेळी झाली.

**<u>धरतीआबा</u>**

पालघर जिल्हयात एक झाड धरती आबासाठी या उपक्रमांतर्गत 20 हजार वृक्षलागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. जव्हार आदिवासी विकास प्रकल्प कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा, एकलव्य आदर्श निवासी शाळा आणि 16 शासकीय मुला मुलींची वसतीगृह  या ठिकाणी या उपक्रमाची सुरुवात काल करण्यात आली.

**<u>मध्यस्थीमोहिम</u>**

यवतमाळ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीनं जिल्हा न्यायालयात विशेष मध्यस्थी मोहिमेअंतर्गत मध्यस्थी कक्ष सुरु करण्यात आला आहे. याचं उद्घाटन आणि राष्ट्रासाठी मध्यस्थी मोहिमेच्या फेरीचं उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या हस्ते काल झालं. ही विशेष मध्यस्थी मोहिम दिनांक १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. या माध्यमातून या मोहिमे संदर्भात नागरिकांमध्ये जागृती करण्यात आली.

**बुरटेनिधन-कोनकर**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणच्या माजी नगराध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्या हेमलता बुरटे यांचं काल वृद्धापकाळाने निधन झालं. त्या ८५ वर्षांच्या होत्या. जनहितासाठी अभ्यासू वृत्तीने, आक्रमक पद्धतीने काम करणाऱ्या कार्यकर्त्या अशी त्यांची प्रतिमा होती.

**निधन**

रत्नागिरीतले विद्यार्थिप्रिय शिक्षक बाळकृष्ण हळबे यांचं काल पुण्यात निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. अध्यापनाची आवड असल्यानं दुबईतली नोकरी सोडून वयाच्या ४२व्या वर्षी, १९८०मध्ये वाणिज्य शाखेचे खासगी शिकवणीवर्ग त्यांनी सुरू केले. सुरुवातीला वेंगुर्ला, राजापूर आणि नंतर रत्नागिरीत त्यांनी २८ वर्षं शिकवणीवर्ग चालवले.

**हवामान-**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**